नोंदणी व मुद्रांक विभाग
**परताव्यास पात्र असलेल्या मुद्रांक शुल्काचा परतावा विहीत मुदतीत करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन परिपत्रक क्र. मुद्रांक-२००५/प्र.क्र. ५१२/म-१**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**
**दिनांक : १५ मे २००६**

**प रि प त्र क :-**

नोंदणी व मुद्रांक विभाग हा नोंदणी फी व मुद्रांक शुल्कापासून शासनाला मोठ्या प्रमाणावर महसूल मिळवून देणारा महत्त्वाचा विभाग आहे. या विभागाकडून शासनाला दरवर्षी सुमारे ४५००/- कोटीच्या वर महसूल मिळतो. या विभागाचे प्रमुख कार्य स्थावर मालमत्तेच्या खरेदी विक्री व्यवहारांचे दस्त नोंदविणे व त्यांचे जतन करणे हे आहे. त्याकरिता लागणाऱ्या मुद्राकांची विक्री बृहन्मुंबईमध्ये प्रधान मुद्रांक कार्यालय, अधिकृत परवानाधारक मुद्रांक विक्रेते व विस्तारीत कक्ष यांचेमार्फत तर इतर ठिकाणी कोषागारामार्फत तसेच अधिकृत परवानाधारक मुद्रांक विक्रेत्यांकडून करण्यात येते.

खराब झालेल्या किंवा गैरवापर केलेल्या किंवा चुकीच्या पध्दतीने वापर केलेल्या किंवा वापरासाठी आवश्यक नसलेल्या मुद्राकांच्या बाबतीत तसेच एखाद्या व्यवहारासाठी खरेदी केलेल्या परंतु काही कारणामुळे व्यवहार रद्द झाला तर त्यासाठी वापरण्यात आलेल्या मुद्रांक शुल्काचा परतावा देण्याबाबत मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ मध्ये तरतूद आहे. अशा परताव्यासाठी सर्व संबंधित मूह कागदपत्रासह विहित मुदतीत परतावापात्र मुद्रांक सादर केल्यास परतावा देण्यात येतो. सद्यःस्थितीत असा परतावा देण्याचे अधिकार मुद्रांक अधिक्षक, प्रधान मुद्रांक कार्यालय व संबंधित मुद्रांक जिल्हाधिकारी यांना खालीलप्रमाणे आहेत.

१)	मुद्रांक अधिक्षक, प्रधान मुद्रांक कार्यालय, मुंबई व मुंबई उपनगर जिल्हयाकरिता परताव्याची रक्कम जास्तीत जास्त	१०,००,०००/- पर्यंत,

२)	अन्य जिल्हयात परताव्याची रक्कम जास्तीत जास्त	१,००,०००/- पर्यंत,

३)	वरील मर्यादेपेक्षा जास्त रक्कम असल्यास नोंदणी महानिरिक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे

मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ मध्ये परतावापात्र मुद्राकांचा परतावा किती कालावधीत देण्यात यावा याबाबत तरतूद नाही. याबाबत परतावा मिळण्यास विलंब होतो. अशा प्रकारच्या तक्रारी विविध स्तरावर होतात. त्यामुळे अशा परताव्याच्या कालावधी निश्चित करणे आवश्यक ठरते. या प्रकरणी सारासार विचार करता परतावा देण्याबाबतची कार्यपध्दती व कालावधी खालीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहे.

मुंबई व मुंबई उपनगर जिल्हा व इतर मुद्रांक जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात परताव्यासाठी प्राप्त झालेल्या अर्जाकरिता एक स्वतंत्र नोंदवही ठेवण्यात यावी. सदर नोंदवहीमध्ये नोंद घेऊन सदर परतावा अर्जाची १५ दिवसाच्या आत तपासणी करावी. काही त्रुटी असल्यास संबंधित पक्षकारांना १५ दिवसाच्या आत त्रुटीची पुर्तता करण्याबाबत लेखी कळवावे. पक्षकाराकडून त्रुटींची पुर्तता झाल्यानंतर जास्तीत जास्त १५ दिवसांच्या आत परताव्याचे आदेश निर्गमित करावेत. नोंदणी महानिरिक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या कार्यालयात प्राप्त झालेल्या परताव्याच्या अर्जाबाबत एक नोंदवही ठेवण्यात यावी. परताव्याचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर सदर अर्जाची छाननी करून १५ दिवसाच्या आत तपासणी करावी. काही त्रुटी असल्यास त्या त्रुटींची पुर्तता झाल्यानंतर एक महिन्याच्या आत परताव्याचे आदेश निर्गमित करण्यात यावे. एकंदरीत मुंबई  व मुंबई उपनगर जिल्हयात तसेच सदर जिल्हयात संबंधीत मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी परताव्याचे आदेश दिड

महिन्यात, तर नोंदणी महानिरिक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे या कार्यालयाकडून २ महिन्याच्या आत परताव्यास पात्र मुद्रांक शुल्क परताव्याचे आदेश निर्गमित करण्यात यावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

**सही/-**
**(भा.सु.तावडे)**
**अवर सचिव**
**महसूल व वन विभाग**

**प्रति,**

**१) नोंदणी महानिरिक्षक व मुद्रांक नियंत्रक महाराष्ट्र राज्य, पुणे.**
**२) सर्व जिल्हाधिकारी व जिल्हा निबंधक**
**३) मुद्रांक अधिक्षक, प्रधान मुद्रांक कार्यालय, मुंबई**
**४) सर्व नोंदणी उपमहानिरिक्षक व मुद्रांक उपनियंत्रक, पुणे (मुख्यालय)**
**५) सर्व सह जिल्हा निबंधक व मुद्रांक जिल्हाधिकारी.**